# <u>डॉ. आंबेडकर महाविद्यालय,</u>

## दीक्षाभूमी, नागपूर

# **राष्ट्रीय सेवा योजना**

2018-2019

### **एन.एस.एस. स्थापना दिवस व गांधी जयंती**

दिनांक २/१०/२०१८

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे २ आक्टोंबर २०१८ ला महात्मा गांधी जयंती व राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार,उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ साहित्यिक डॉ. प्रकाश खरात, पत्रकार देवनाथ गंडाटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.पी. फरकाडे मंचावर उपस्थित होते.

डॉ. प्रकाश खरात यांनी विद्यार्थांना सामाजिक जाणिवेच्या संदर्भात मार्गदर्शन केले. गंडाटे यांनी मा. गांधीच्या जीवनाचा आधार घेत तरुणांना  सोशल मीडियाच्या संदर्भात उपयुक्त माहिती दिली. संचालन कु. गझाला अहमद, आभार कु. मयूरी लहाणे यांनी केले. या कार्यक्रमात ४०० विद्यार्थी उपस्थित होते.







DR. AMBEDKAR COLLEGE DEEKSHABHOOMI, NAG
NSS
(National Service Scheme)
NDATION
Aag


DR. AMBEDKAR COLLEGE DEEKSHABHOOMI, NAGPUR
NSS
(National Service Scheme)
ION DAY

# धम्मचक्र प्रवर्तन दिवस

दिनांक:- १७/१०/२०१८ व १८/१०/२०१८

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी धम्मचक्र प्रवर्तन दिवसाला दिनांक १७/१०/२०१८ व १८/१०/२०१८ ला दीक्षाभूमीवर भारतातून नव्हे तर जगभरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी लोक येत असतात या पवित्र भूमीवर येणाऱ्या लोकांना कुठलाही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच शांततेत लोकांना स्तूपातील दर्शन घेता यावेत आणि पोलिस प्रशासनाला मदत म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५० विद्यार्थांनी १७ तारखेला सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत व १८ तारखेला सकाळी ७ ते रात्री २ वाजेपर्यंत दीक्षाभूमी परिसरात आपल्या कार्याचे योगदान दिले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या मार्गदर्शनात अत्यंत सुंदर पद्धतीने हा कार्यक्रम पार पडला.







